# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.६/२०२५ दिनांक १३/०८/२०२५
स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर वेळ- दुपारी ०३.०० वा.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.१३.०८.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२०२८/२०२५ दि.११.०८.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.१३.०८.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा
अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

**विषय नं.१** दि.२०.०६.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिति सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.३४९** दि.२०.०६.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिति सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. श्री साईबाबा शैक्षणिक संकुल येथील सांडपाणीचे नियोजन करणेकरीता पूर्वबाजुला टाकलेली ड्रेनेज लाईन शिर्डी नगरपालीका, शिर्डी यांचे मुख्य ड्रेनेजलाईनला जोडणेकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/१** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

२. श्रींचे समाधी मंदिर, व्दारकामाईमध्ये विविध कामांकामी सोन्याचा मुलामा व सोने वस्तु देणगी स्वरुपात देणेबाबत भक्तांच्या अर्जावर विचार करणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

३. श्री. संदिप अरविंद मिरजकर, पहारेकरी, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

**निर्णय क्र.३५०/३** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

४. श्री.सुदेश रामदास शिंदे, कुशल कंत्राटी कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांची रुग्णालयीन विशेष पगारी रजा मंजुर करणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

५. महाराष्ट्र शासन व Meta यांचेमध्ये झालेल्या धोरणात्मक भागीदारी अंतर्गत श्री साईभक्तांना संस्थानमार्फत उपलब्ध सुविधा व्हॉटस्अॅपव्दारे उपलब्ध करुन देणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

६. नवीन दर्शनरांग इमारतीतील १० लिफ्टचे उत्पादक कंपनी मे. मे.ओटिस इलेव्हेटर कंपनी इंडिया लि. यांना तीन वर्ष कालावधीकरीता कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

७. देणगीदार साईभक्तांना सेवा-सुविधा देतांना येणा-या अडचणींबाबत निर्णय होणेस व त्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

**निर्णय क्र.३५०/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**८. सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०२५ (वर्ष ३१वे) नेहमीचे प्रथा, परंपरेप्रमाणे साजरा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५०/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३ साई आश्रम भक्तनिवास येथील ॲम्फीथिएटरमधील लेडीज व जेन्टस् टॉयलेट ब्लॉकची दुरुस्ती व नुतनीकरण करणे तसेच साई आश्रम येथील प्रसाद भोजन हॉलमध्ये कोटा फ्लोरींग बसविणेसाठी प्राप्त ई-निविदापैकी निविदाधारक मातोश्री इंटेरीअर्स, नाशिक यांची रु.२४,४९,६७७/- मात्र इतक्या रकमेची निम्नतम ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३५१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४ श्री साईबाबा संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील श्री साईबाबा शैक्षणिक संकुलामध्ये तयार करण्यात आलेल्या ऑडीटोरीअम हॉलचे उद्घाटन होऊन विद्यार्थ्यांसाठी खुले करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५२ प्रस्ताव मंजुर. ऑगस्ट महिन्याचे तीस-या आठवडयातील तारीख सर्वांचे सोईनुसार निश्चीत करण्यात यावी. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५ गोदावरी उजवा तट कालवा वितरीका क्र.११ वरील अहिल्यानगर–मनमाड महामार्ग ते गोदावरी उजवा कालवा या लांबीतील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करुन त्यांचे वापरासाठी कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग यांचे समवेत करावयाच्या करारनाम्याचे मसुदयातील अटीनुसार देखरेख शुल्क तांत्रिक मान्यता फी व संस्थानमार्फत सल्लागार नेमणुक करणे याबाबीसाठी येणारे अंदाजे रु.१९७.४७ लक्ष मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ३५३ प्रस्ताव मंजुर. सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/ विधी विभाग)**

---

**विषय नं.६** श्री साई प्रसादालय येथील मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन येथे बसविणेत आलेली वायुविजन यंत्रणा, साईटेक प्रोजेक्टच्या मशिनरी तसेच त्याकरीता असलेली वातानुकुलित यंत्रणा, आर.ओ.प्लॅटच्या मशिनरी, श्री साई प्रसादालयातील चपाती तयार करण्याच्या मशिनरी, फुड टेस्ट लॅबमधील मशिनरी व वातानुकुलित यंत्रणा तसेच बायोगॅस प्लॅटच्या मशिनरीचा वाढीव लोडनुसार २५०० KVA क्षमतेचे कॉम्पॅक्ट सबस्टेशन, १२५० KVA क्षमतेचे ०२ नग जनरेटर, मिटरींग क्युबिकल, इलेक्ट्रीकल मेन डिस्ट्रीब्युशन पॅनल व सबपॅनल, केबल्स इत्यादी खरेदी करुन बसविणे व त्यासंबंधीत इतर सर्व अनुषंगिक कामाकरीता संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,३७,९३,५२०/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत .

**निर्णय क्र.३५४** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग, नाशिक यांचा पर्यायी व्यवस्थेच्या संदर्भाने अभिप्राय घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- विद्युत विभाग)

---

**विषय नं.७** मंदिर परिसरातील गेट नं.०१ जवळील ध्वजस्तंभाजवळील काढण्यात आलेला हायमास्ट पोल “साई धर्मशाळा भक्तनिवास” परिसरामधील पूर्व बाजूचे पार्किंगमध्ये उभारणी करणे, साई धर्मशाळा भक्तनिवास परिसरामधील स्ट्रीट लाईटच्या खराब झालेल्या केबल व त्यासंबंधीत इतर सर्व अनुषंगिक कामे करणेकामी त्याचप्रमाणे उत्तर बाजूचे पार्किंगमधील सिक्युरिटी केबिनकरीता व “ए” इमारतीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या हौदाकरिता केबल टाकणे कामाकरिता संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२२,६३,२७९/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३५५** प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.८** श्री साईभक्तांना पुरविणेत येणा-या अत्यावश्यक सेवा/ सुविधा अविरतपणे सुरु राहणेचे दृष्टीकोनातुन तातडीने कार्यवाही होणेकामी मंदिर परिसरातील सबस्टेशनमधील 3x750 के.व्ही.ए. जनसेटच्या सिक्रोनायझिंग पॅनलमधील सद्यस्थितीतील नादुरुस्त झालेली कंन्टोल सिस्टीम बदलणे व त्या संबधीतील इतर सर्व अनुषंगीक कामाकरीता कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून

संस्थानचे विहीत पध्दतीने दरपत्रक मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,८८,५४०/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३५६ प्रस्ताव मंजुर.**

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.९** श्री साईबाबा संस्थानचे विज बिलात आर्थिक बचत तसेच भविष्यात स्वच्छ हरित ऊर्जा, पर्यावरण, विकासात्मक दृष्टीकोनातून संस्थानचे सद्यस्थितीतील रिक्त असलेल्या निमगाव-को-हाळे, तालुका-राहाता येथील गट क्रमांक व उपविभाग २३८/१ मधील २७ आर, निमगाव-को-हाळे, तालुका-राहाता येथील गट क्रमांक व उपविभाग २५०/१ मधील १ हेक्टर ८५ आर तसेच कनकुरी साठवण तलाव येथील गट क्रमांक व उपविभाग १२१/ब/१ पैकी, १२१/अ/२, १२१/अ/३ येथील २ हेक्टर २९ आर या जागेवर १९१८.०८ kw DC क्षमतेचा ग्रिड कनेक्टेड सोलर पी.व्ही. सिस्टीम प्रकल्पाची उभारणीकामी येणा-या खर्चास तसेच सदरकामी नामांकित कंपनीचे CSR फंडातून रक्कम उपलब्ध झाल्यास त्यातून सदर प्रकल्पाची कार्यवाही संस्थानचे विहीत पध्दतीने करणेस मान्यता मिळणेबाबत

**निर्णय क्र.३५७ प्रस्ताव मंजुर. CSR फंडातून सदरचा प्रकल्प पुर्ण करण्यात यावा.**

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.१०** मे.पॉवरकॉप, अहमदनगर यांचेमार्फत करण्यात आलेल्या साईबाबा संस्थानचे विद्युत यंत्रणेचे एनर्जी ऑडीट व सेफ्टी ऑडीटचे प्रेझेंटेशन सादर करणेबाबत तसेच त्यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणेस व त्यानुसार विद्युत विषयक उपाय योजनांबाबत विद्युत विभागामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या तज्ञ सल्लागार यांचे अभिप्राय/ मार्गदर्शनानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३५८ प्रस्ताव मंजुर. प्राधान्याने करावयाच्या कामानुसार व कामाचे कालावधीनुसार (Payback period) प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.११ सन २०२५-२६ करीता एक वर्षाचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर व TCCA-90 क्लोरीन पावडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे रु.१६,८८,४३०/- मात्रचे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर मटेरीअल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेसाठी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५९ वाढीव खर्चाचे तपशीलासह सविस्तर फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१२ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) ता. राहाता, जि.अहिल्यानगर टप्पा क्र.१ (संस्थान) कामाचे ३ रे धावते देयक व ४ थे आणि अंतिम देयक म.जी.प्रा.विभाग, संगमनेर यांनी प्रमाणित केलेप्रमाणे ठेकेदार दि इंडियन हयुम पाईप कं.लि., पुणे यांना आदा करणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२०.०१.२०२५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ रद्द होणेस व सदरहू देयके ठेकेदार यांना आदा करणेसाठी मान्यता मिळणेस तसेच ठेकेदार यांनी मागणी केलेली अतिरिक्त रक्कम नाकारणेस व इतर अनुषंगीक बाबींवर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३६० तहकुब. अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१३ प्रसादालय विभागाकरीता स्टे.स्टील किचन व इक्युपमेंट/भांडी खरेदीकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१४ मेकॅनिकल विभागाकरीता दैनंदिन वर्कशॉप करीता आवश्यक फॅब्रिकेशन मटेरीअल व मशिनरी स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६२ मागील दोन वर्षात खरेदी केलेल्या मटेरीअलच्या वापरासह सविस्तर फेर प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१५** **श्री साई प्रसादालय किचन मधील जुना थर्मेक्स मेक Rx 400 स्टिम बॉयलरची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेस व नवीन वाढीव क्षमतेचा RXD-850 स्टीम बॉयलर खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१६** **साईआश्रम भक्तनिवास साई धर्मशाळा यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामाकरीता मे.डिस्टील एजुकेशन अॅन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. दिल्ली यांचा कार्यादेश रद्द करुन मागील ठेकेदार यांना मुदतवाढ देणेस व नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६४ सुधारीत विषय आजचे सभेत आयत्या वेळेचा विषय क्र.१ व विषय क्र.१० घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१७** **विविध विभागांचे दरवाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६५ फक्त प्रस्ताव ड मंजुर. लाडू प्रसाद पाकीट विक्रीची किंमत रु.३०/- करण्यात यावी. उर्वरीत प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१८** **साई आश्रम भक्तनिवास विभागाकरीता उशी खरेदी कामी पुरवठा आदेश देणेबाबत**

**निर्णय क्र.३६६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम गादीसाठी क्विल्टींग कापड खरेदी करणे व गाद्या शिवून घेणेकामी ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२० श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३६८ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२१ साठा संपुष्टात आलेल्या संस्थान प्रकाशित २६ पुस्तकांचे पुनर्मुद्रणाचे वाढीव छपाईकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२२ प्रति वर्षाप्रमाणे सन-२०२६ या एक वर्षाकरीता श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानतर्फे प्रचलित पध्दतीने प्रकाशित करणेस व साईभक्तांना विक्रीकामी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७० प्रस्ताव मंजुर. सी. ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी मशिनरी व उपकरणे खरेदी मधील ज्या मशिनरी/उपकरणे करीता अंदाजे प्रस्तावीत केलेल्या किंमतीपेक्षा ई-निविदेत जास्त किंमती प्राप्त झालेल्या होत्या अशा मशिनरी/उपकरणे करीता सुधारीत अंदाजे प्रस्तावीत किंमत घेऊन मागविण्यात आलेल्या फेर ई-निविदेस अनुसरुन कमर्शिअल ई-निविदेतील निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७१ प्रस्तावात नमुद अ.न.१,२ व ९ देणगीमध्ये प्राप्त झालेले आहे. अ.नं.३ ते ६ सी.ए. ची मान्यता मिळाल्यानंतर पुरवठा आदेश देण्यात यावा. अ.नं.८ मध्ये सी.ए. मान्य असल्याने पुरवठा आदेश देण्यात यावा. अ.नं.७ फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२४ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये भाडेतत्वावर औषध दुकान चालु करणेकामीच्या प्राप्त अधिकतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल परिसरामध्ये जेनेरीक औषध दुकान चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्या-टप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७४ मागील प्रस्तावाचे अवलोकन करुन निर्णय घेता येईल. परंतु कार्यरत असलेल्या डॉक्टरांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७५ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८ डॉ. मुकुंद अर्जुन चौधरी, मेंदु शल्य विशारद, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आलेनंतर पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६ मागील प्रस्तावाचे अवलोकन करुन निर्णय घेता येईल. परंतु कार्यरत असलेल्या डॉक्टरांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.६,३३,४४१/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३० श्री साईनाथ रुग्णालयातील नेत्र विभागात करणेत येणा-या शस्त्रक्रिया दरांमध्ये बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईनाथ रूग्णालय)**

---

**विषय नं.३१ संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या संस्थान कायम व संस्थान कंत्राटी (५९८) कर्मचा-यांच्या वारसांना ठेकेदारामार्फत आऊटसोर्स ऐवजी इनसोर्स कंत्राटी म्हणून कामावर सामावून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३७९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२ श्री साईबाबा महाविद्यालय-प्राचार्य पद भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३८० सेवा प्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३ श्री. राजाराम भटु सावळे, लिपीक-टंकलेखक, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३८१ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४ श्री.भिका पांडूरंग आव्हाड, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३८२ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३५** **श्री.हेमंत भानुदास शिरसाठ. सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.३८३ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री.बाळासाहेब केशव सावंत विद्युत पर्यवेक्षक, विद्युत विभाग यांनी मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेल्या दि.०८.११.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३८४ या संदर्भाने सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी मा.अध्यक्षा यांना पाठविण्यात यावेत.**
**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३७** **मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार १) अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता, औद्योगिक प्रशिक्षण संस्था २) श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त), ३) श्री.प्रकाश दादा क्षिरसागर, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) यांचे समग्र चौकशी बाबत.**

**निर्णय क्र.३८५ तहकुब.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेकामी प्राप्त झालेल्या अर्जांबाबत.**

**निर्णय क्र.३८६ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३९** **सन-२०२५ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४०** **संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात भाडेतत्वावर वापरास दिलेले १० कियॉस्क/गाळे पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४१ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात विविध ७ ठिकाणी चालवत असलेले जागा/गाळे च्या वापरास पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदत वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४२ मौजे कनकुरी, मौजे निमगाव को-हाळे, ता.राहाता येथील जमीन खरेदी घेणेबाबत श्री.ज्ञानदेव देवराम पवार व इतर ४, श्री. रामराव मारुती डांगे व इतर ०२, सौ.शिल्पा चारुदत्त पाटील यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३९० तहकुब. कागदपत्रे अवलोकनार्थ मा.अध्यक्षा यांना पाठविण्यात यावेत.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४३ मौजे शिर्डी, ता.राहाता येथील सर्व्हे १९५/४ पै. व सर्व्हे १९५/५ मधील काही क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना रस्त्यासाठी कायम खरेदी देणेबाबत श्री.आबासाहेब भास्कर कोते व छबुबाई भास्कर कोते यांच्या दि.२८.०४.२०२५ रोजीच्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३९१ तहकुब. कागदपत्रे अवलोकनार्थ मा.अध्यक्षा यांना पाठविण्यात यावेत.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४४ शिर्डी संस्थान मंदिर परिसरामधील निर्माल्य साठविण्यासाठी जागा व निर्माल्यापासून तयार केलेले उत्पादने विक्रीसाठी जागा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३९२ अवलोकन केले.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४५** **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्कींगमध्ये फळे विक्रेत्यांना फळे विक्री करणेकामी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून व करारनामा नोंदवून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे,ता.राहाता येथील जमीन गट नं.८७ व ८८ मधील सैनिक आरामगृह, शिर्डी साठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेल्या जागेत बांधकाम करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३९४ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग )**

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा मंदिरचे गेटवर CISF सुरक्षा नेमणुक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम-२००४ मध्ये करावयाच्या सुधारणा/दुरुस्ती करणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.३९६ तहकुब.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.४९** **ठेकेदाराकडील कुशल कंत्राटी कर्मचारी (तांत्रिक) व कनिष्ठ अभियंता यांचे मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.३९७ अशा स्वरुपाचे प्रस्ताव असल्यास तपासून एकत्रित प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.५०** **संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचा विमा उतरविणेबाबत.**

**निर्णय क्र.३९८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.५१** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१२.२०१० चे ठरावानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मंदिर विभागाकडील सतत वापरामुळे सोने / चांदीच्या वस्तुंचे वजनात येणारे घट-तुट (जादा) ची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९९** **नोंद घेतली. मोजणी पंचासमक्ष करावी.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.५२** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तुंची तपासणी करणेकामी मुल्यांकनकारांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४००** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५३** **माहे मार्च-२०२५ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४०१** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५४** **माहे एप्रिल-२०२५ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४०२** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५५** **माहे मे-२०२५ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४०३** **नोंद घेतली.** **(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५६ माहे जून-२०२५ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४०४ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.५७ श्री.विजय नायडू, कोपरगाव यांनी इच्छा दर्शविलेप्रमाणे त्यांची "तांत्रिक सल्लागार" म्हणून विना मोबदला स्वरुपात नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४०५ तहकुब. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.५८ खेळाडू विद्यार्थिनींकरीता मोफत बस सुविधा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)**

---

**विषय नं.५९ माहे डिसेंबर-२०२४ ते जून-२०२५ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गाईचे शुध्द तूप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आालेल्या तपासण्यांचे अहवालांबाबत.**

**निर्णय क्र.४०७ नोंद घेतली. (कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१ साईआश्रम भक्तनिवास यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामाकरीता मे.डिस्टील एजुकेशन अॅन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. दिल्ली यांचा कार्यादेश रद्द करुन मागील ठेकेदार यांना मुदतवाढ देणेस व नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४०८ एल-२,एल-३, एल-४ आणि एल-५ यांना एल-१ च्या दरात काम करण्यास तयार आहे काय? याबाबत विचारणा करावी. तयार असल्यास पुढील कार्यवाही करावी. तयार नसल्यास फेर ई-निविदेचा प्रस्ताव सादर करावा. तो पर्यंत पुर्वीचे ठेकेदारास मुदतवाढ देण्यात यावी. (कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२ साई आश्रम भक्तनिवास येथील सर्व १३ इमारतींचे स्काय लाईट डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणेसाठी येणारे रक्कम रु.३७,५०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४०९ सविस्तर फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३ श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, विरार (पुर्व) यांचेकडून संस्थानला मौजे निघोज येथील साई पालखी निवारामधील देणगी मिळालेल्या डी इमारतीमधील उर्वरीत कामे पुर्ण करणेसाठी अंदाजे आर्किटेक्टरची नेमणूक करणे या प्रकल्पासाठी जीएसटी सह अंदाजे रु.१५,५८,७४,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणे व या इमारतींचा शैक्षणिक उपक्रमांसाठी (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अ‍ॅकेडमी) वापर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१० स्थळ निरक्षण करुन फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ द्वारावती भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवासस्थान (500 खोल्या) या ठिकाणी अनुक्रमे 200 KLD व 300 KLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) उभारणीकरीता संकल्पन, अभियांत्रिकी, पुरवठा, उभारणी, चाचणी, समाधानकारकरित्या वापर सुरु करणे व एक वर्षाकरीता त्याची दुरुस्ती व देखभाल (Operation & Maintenance) करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्व ई-निविदा रद्द करून फेरनिविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४११ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **रविवार दि.०७ सप्टेंबर, २०२५ रोजी खग्रास चंद्रग्रहाणमुळे दैनंदिन कार्यक्रमामध्ये बदल करणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.४१२ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **विद्युत विभागात झालेल्या विद्युत साहित्यांच्या चोरी/अनिमियततेबाबतचे प्रकरणात एफआरआय दाखल करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१३ विभागीय चौकशी करुन प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**
**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक औषधे खरेदीमधील Tablet-Injection-Syrup-Ointment-Drop, Dental, Laboratory, Ayurvedic, Suture Material, O.T., Cathlab, Cardiac Surgical & Miscellaneous Material खरेदीकामी दर निश्चिती (Rate Contract) करणेकामीच्या फेर ई-निविदेस अनुसरुन निम्नत्तम दरधारकांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत**

**निर्णय क्र.४१४ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **सोशल मिडीया एन्फ्लुएन्सर्स संमेलनात केवळ फॉलोअर्सची संख्या कमी असल्यामुळे अपात्र झालेल्या एन्फ्लुएन्सर्स यांना सहभागी करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४१५ प्रस्ताव नामंजूर.** **(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९** **श्री साईबाबा संस्थान एम्प्‍लॉईज क्रेडीट सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान मालकीचे नवीन दर्शनरांग तसेच साई आश्रम भाग-१, व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान तसेच हॉस्पिटल परिसात सोसायटी चालवत असलेल्या स्टॉलमध्ये बेकरी पदार्थ विक्रीस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१६** **प्रस्ताव मंजूर. परंतु बचत गटाने तयार केलेले उत्पादनानां प्राधान्य देण्यात यावे.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **साई धर्मशाळा यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामाकरीता मे.डिस्टील एजुकेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. दिल्ली यांचा कार्यादेश रद्द करुन मागील ठेकेदार यांना मुदतवाढ देणेस व नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१७** **एल-२,एल-३, एल-४, एल-५, एल-६, एल-७ यांना एल-१ च्या दरात काम करण्यास तयार आहे काय? याबाबत विचारणा करावी. तयार असल्यास पुढील कार्यवाही करावी. तयार नसल्यास फेर ई-निविदेचा प्रस्ताव सादर करावा. तो पर्यंत पुर्वीचे ठेकेदारास मुदतवाढ देण्यात यावी.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे लॉण्ड्री युनिटमध्ये दि.३०/०५/२०२५ रोजी श्री. सुदेश रामदास शिंदे, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना कर्तव्यावर असतांना अपघात झाल्याने वैद्यकीय उपचाराकामी आलेल्या खर्चापोटी वैद्यकीय आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४१८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**वरील निर्णय क्र.३४९ ते ४१८ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ७.१५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**